# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२–२२३१०४ E-Mail : gug.registrar@gmail.com

जा.क्र./गोंवीग/कुसका/ 832 /२०२१ दिनांक २१/०१/२०२१

**प्रति,**

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय :– प्रत्येक महाविद्यालयात स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र स्थापन करणे आणि समन्वयक नियुक्त करणे....**

**संदर्भ** :– १) सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्रमांक उशिनाग/आस्था/स्पर्धा परिक्षा/१९४/२०२१ दि.१४.०१.२०२१

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संचालक, उच्च शिक्षण, पुणे तसेच सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर यांनी आपल्या महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा केंद्र स्थापन करण्याबाबत व समन्वय नियुक्त करणेबाबत वेळोवेळी निर्देशीत केलेले आहे.

सदरहुच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातर्फे सदर बाबतची अंमलबजावणी झालेली नसल्यास तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग नागपूर यांना पाठविण्यात यावा व अहवालाची एक प्रत कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठास पाठविण्यात यावी.

21/1/2021

संलग्न :– वरीलप्रमाणे.

**(डॉ. अनिल चिताडे)**
कुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी माहितीकरीता :–**

१. मा. कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. प्र–कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिव कार्यालय
आवक क्र. ...... दि. ............
कायदा क्र. 775 दि. 20/1/2021

महाराष्ट्र शासन
**सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग,**
**जुने मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर - ४४० ००१**
**Web : www.jdnagpur.in**

E-Mail : jdhengp@rediffmail.com E-Mail : jdhengp@gmail.com

फोन नं. ०७१२-२५६१७१३ फॅक्स न. ०७१२-२५५४२१०

क्रमांक : उशिनाग/आस्था/स्पर्धा परिक्षा/१९८ /२०२१ दिनांक : 18/01/2021

स्मरण पत्र-१

प्रति,

१. कुलसचिव,
 **रा.तु.म.नागपूर विद्यापिठ,नागपूर/गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली/**
 **कविकुलगुरू कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक/नॅशनल लॉ युनिवरसिटी, नागपूर.**

२. संचालक/प्राचार्य/वसतीगृह प्रमुख
 **सर्व शासकीय संस्था/महाविद्यालय/वसतीगृह,**

३. प्राचार्य,
 **सर्व अशासकीय अनुदानित, विना अनुदानित,**
 **कायम बिना अनुदानित महाविद्यालये,**

**विषय : प्रत्येक महाविद्यालयात स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र स्थापन करणे आणि समन्वयक नियुक्त करणे....**

**संदर्भ : १) संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं-२०२०/स्पर्धा परिक्षा/प्रशा-३/७६५६ दि.१७.११.२०२०**
**२) संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं-२०२०/२४७/स्पर्धा परिक्षा/प्रशा-३/९००४, दि.३०.१२.२०२०**
**३) या कार्यालयाचे पत्र क्र. उशिनाग/आस्था/स्पर्धा परीक्षा/५३७३/२०२०, दि.१८.११.२०२०**
**४) या कार्यालयाचे पत्र क्र.उशिनाग/आस्था/स्पर्धा परीक्षा/१३४/२०२१, दि. ११.०१.२०२१**

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भिय पत्र पहावे. सदर पत्रान्वये आपणास कळविण्यात आले होते की, आपल्या महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र स्थापन करण्याबाबत व समन्वय नियुक्त करणेबाबत व तसा अहवाल सादर करण्यास कळविले होते. परंतु आपण सदर सूचनेची दखल घेतलेली नाही तसेच योग्य ती अंमलबजावणी केलेली दिसून येत नाही. ही खेदाची बाब आहे. या विभागातील केवळ ०३ टक्के महाविद्यालयांनी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र स्थापन केलेले आहे. तसेच माहिती सादर केलेल्या अनेक महाविद्यालयांनी समन्वयकाचे नावापुढे भ्रमणध्वनी क्रमांक व ईमेल पत्ता नमूद केलेला दिसून येत नाही. वरील विषयांकित संदर्भीय पत्राच्या च्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र स्थापन करणे आणि समन्वयक नियुक्त करुन तसा अहवाल **आजच तात्काळ** सादर करण्यात यावा अन्यथा **आपले महाविद्यालयाचे वेतन देयक स्विकारल्या जाणार नाही व वेतन उशीरा झाल्यास सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.** सदर बाब अतितात्काळ समजुन प्राध्यान्याने कार्यवाही करुन त्वरीत माहिती सादर करावी.

**(डॉ.महेशकुमार साळुंखे)**
सहसंचालक उच्च शिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर

प्रत : १. मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-०१ यांना माहितीस्तव सविनय सादर.

महाराष्ट्र शासन
सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग,
जुने मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर - ४४० ००१
Web : www.jdnagpur.in
E-Mail : jdhengp@rediffmail.com E-Mail : jdhengp@gmail.com
फोन नं. ०७१२-२५६१७१३ फॅक्स न. ०७१२-२५५४२३०

क्रमांक : उशिनाग/आस्था/स्पर्धा परिक्षा/१३८ /२०२० दिनांक : ११/१/२०२१

स्मरण पत्र

प्रति,

१. कुलसचिव,
रा.तु.म.नागपूर विद्यापिठ,नागपूर/गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली/
कविकुलगुरू कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक/नॅशनल लॉ युनिवरसिटी, नागपूर.

२. संचालक/प्राचार्य/वसतीगृह प्रमुख
सर्व शासकीय संस्था/महाविद्यालय/वसतीगृह,

३. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित, विना अनुदानित,
कायम विना अनुदानित महाविद्यालये,

**विषय : प्रत्येक महाविद्यालयात स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र स्थापन करणे आणि समन्वयक नियुक्त करणे....**

**संदर्भ : १) संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं-२०२०/स्पर्धा परिक्षा/प्रशा-३/७६५६ दि.१७.११.२०२०**
**२) संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं-२०२०/२४७/स्पर्धा परिक्षा/प्रशा-३/९००४, दि.३०.१२.२०२०**
**३) या कार्यालयाचे पत्र क्र. उशिनाग/आस्था/स्पर्धा परीक्षा/५३७३/२०२०, दि.१८.११.२०२०**

उपरोक्त संदर्भिय पत्राचे अवलोकन करावे. (प्रत सोबत जोडलेली आहे.)

वरील विषयांकित संदर्भीय पत्राच्या च्या अनुषंगाने नागपूर विभागातील सर्व अकृषी विद्यापीठे, सर्व शासकीय संस्था/महाविद्यालये/वसतिगृहे, अशासकीय अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित महाविद्यालयांना या कार्यालयाचे संदर्भ पत्र क्र. ३ अन्वये आपल्या महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र स्थापन करणे आणि समन्वयक नियुक्त करणेकरीता कळविण्यात आलेले होते परंतु अद्यापही आपणाकडून माहिती अप्राप्त आहे. तरी पुनश्चः आपणास कळविण्यात येते की सोबत जोडलेल्या विवरणपत्रात तात्काळ आजच संचालक, भारतीय प्रशासकीय सेवापुर्व प्रशिक्षण संस्था, नागपूर यांचे directoriasngp@rediffmail.com या इमेलवर तसेच या कार्यालयात सादर करण्यात यावा.

सहपत्र : संदर्भिय पत्र व विवरण पत्र

(डॉ.महेशकुमार साळुंखे)
सहसंचालक उच्च शिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर

प्रत : १. मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-०१ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. संचालक, भारतीय प्रशासकीय सेवापुर्व प्रशिक्षण संस्था, नागपूर यांनी वरील प्रमाणे माहिती एकत्रित करुन दर महिन्याच्या शेवटच्या दिवशीची स्थिती या कार्यालयात सादर करण्यात यावी.

## स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात नेमलेल्या समन्वयकाची माहिती

| .अ.क्र | महाविद्यालयाचे नाव | समन्वयकाचे नाव | भ्रमणध्वनी / दुरध्वनी क्रमांक | ई-मेल |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |